बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

Marketing & Publicity Department
Head Office, Pune

# बँक ऑफ महाराष्ट्राला आरसेटी संवर्गातील उत्कृष्ट बँकेचा पुरस्कार




**पुणे, 19 डिसेंबर, 2019:** महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण (आर-सेटी) संस्थेच्या माध्यमातून केल्या गेलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल बँक ऑफ महाराष्ट्राला 2018-19 वर्षाचा “आर-सेटी संवर्गातील बेस्ट परफॉरमिंग बँक” असा पुरस्कार मिळाला असून दिल्ली येथे दिनांक 19 डिसेंबर 2019 रोजी ग्रामीण मंत्रालयातर्फे आयोजित एका समारंभात प्रदान करण्यात आला.

केंद्र सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण, ग्रामीण विकास आणि पंचायती राज मंत्रालयाचे कॅबिनेट मंत्री श्री नरेंद्र सिंग तोमर यांच्या हस्ते दिला गेलेला बेस्ट परफॉरमिंग बँकेचा पुरस्कार बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री हेमन्त टम्टा यांनी स्वीकारला. यावेळी बँकेचे ग्रामीण विकास विभागाचे मुख्य व्यवस्थापक श्री ए डी चव्हाण उपस्थित होते.

ग्रामीण युवा आणि महिलांना छोट्या छोट्या व्यवसायातून स्वयंरोजगार निर्मितीचे कौशल्य प्राप्त होण्याकरिता अनुषंगिक प्रशिक्षण देण्यासाठी बँकेने महाराष्ट्र राज्यात सात ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था स्थापन केल्या आहेत. या प्रशिक्षण संस्था पुणे, ठाणे, नाशिक, औरंगाबाद, जालना, अमरावती आणि नागपूर येथे असून या संस्था उमेदवारांना प्रशिक्षण देतात. या सातही क्षेत्रीय स्वरोजगार प्रशिक्षण संस्थांना (आरसेटी) वर्ष 2018-19 साठी “एए” दर्जा दिला गेला आहे.

बँक ऑफ महाराष्ट्रने आरसेटी येथून प्रशिक्षण प्राप्त उमेदवारांसाठी बँकेच्या विभागीय कार्यालयांच्या समन्वयाने नवीन क्रेडिट लिंकेज योजना लागू केली. बँकेने संबंधित सात जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त गावे / गटातील शेतकरी कुटुंबातील बेरोजगार तरुण यांच्यासाठी "महा शेतकरी आत्मनिर्भर योजना" देखील सुरू केली आहे. या योजनेत गरजांवर आधारित आणि संभाव्य क्षमता असलेल्या उपक्रमांची निवड करून युवकांना प्रशिक्षण दिले जाते तसेच या योजनेंतर्गत प्रशिक्षित उमेदवारांना त्वरित कर्जदेखील मंजूर केले जाते.